**नकोच ते**

कोणाची सत्ता नको
कोणाचा भत्ता नको
कोणाच्या विजयावर
कोणाचा सट्टा नको

कोणाची टाळी नको
कोणाची पोळी नको
कोणाच्या खाण्यावर
कोणाचा बळी नको

कोणाचे जगणे नको
कोणाचे मरणे नको
कोणाच्या झिजण्यावर
कोणाचे सजणे नको

कोणाचे देणे नको
कोणाचे घेणे नको
कोणाच्या रडण्यावर
कोणाचे हसणे नको

कोणाचे चढणे नको
कोणाचे पडणे नको
कोणाच्या फुलण्यावर
कोणाचे खुडणे नको

**------संध्या रानडे**